# <u>बहन्मुंबई महानगरपालिका</u>

## सह आयुक्त (परि.चार) यांचे कार्यालय

**क्र. एमडीसी/ 4194 /ओडी  दि. 9.06.2021**

## <u>परिपत्रक</u>

**विषयः**- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील कामासंबंधातील ई-कोटेशन / अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत कंत्राटदारांविरुध्द करण्यात आलेल्या चौकशीच्या अनुषंगाने बजावण्यात येणा-या शिक्षादेशाबाबत.

**संदर्भः- 1) MGC/F/ 5666 दि. 04/03/15 व दि.09/04/15**
**2) MGC/F/ 6684 दि. 25/06/18 व दि.16/08/18**

विषयांकीत प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील CWC कामासंबंधातील ई-कोटेशन/ अतारांकित निविदा प्रकरणी आढळून आलेल्या अनियमिततेबाबत मा. म.न.पा. आयुक्त यांनी दिनांक 04.03.2015 व दिनांक 09.04.2015 रोजी पारित केलेल्या संदर्भ क्र. 1 अन्वयेच्या आदेशान्वये, तत्कालीन उप-आयुक्त (आ.व्य.) सध्या सेवानिवृत्त, तत्कालीन उप आयुक्त (परि.3), तत्कालीन उप-आयुक्त (परि.7) यांचा समावेश असलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीस चौकशी करण्याचे आदेश पारित केले होते. तसेच, म.न.पा. आयुक्तांच्या दिनांक 26.03.2015 अन्वयेच्या आदेशान्वये संबंधित विभाग कार्यालयातील विभाग कार्यकारी अभियंता/ सहाय्यक आयुक्त यांच्यामार्फत संबंधित कंत्राटदारांवर 'कारणे दाखवा नोटीस' बजावून तदनुषंगाने त्रिसदस्यीय समितीस अभिप्राय सादर करण्याचे आदेश पारित केले होते.

चौकशीअंती मा.म.न.पा. आयुक्त यांच्या संदर्भ क्र. 2 अन्वयेच्या मंजूरीनुसार खालील नमूद केलेल्या केलेल्या कंत्राटदारांवर त्यांच्यासमोरील रकान्यात नमूद केल्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

सही/- दि. ९.६.२०२१
**सह आयुक्त (परि.चार)**

**Order Issued By DMC(Z-IV) OFFICE**

| अनु.क्र. | कंत्राटदार | वेन्डर नं. | कंत्राटदारावर करण्यात आलेली कारवाई |
|---|---|---|---|
| १ | मे. सॅव्हकॉन कंन्स्ट्रक्शन | 18369 | मे. सॅवकॉन कंस्ट्रक्शन (M/s. Savcon Constructions) (वेन्डर नं.18369) यांजवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होत असल्याने त्यांना शिक्षा म्हणून रु.5,00,000/- (रुपये पाच लाख) दंड करण्यात येत आहे. |

सही/- दि. ९.६.२०२१
**सह आयुक्त (परि.चार)**